महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती, नागपूर/आस्था/परिपत्रक/2236/2024-25 **दिनांक** :-02/09/2024

# -: परिपत्रक :-

**विषय:-** **भारतीय वन सेवा (UPSC) -2024 पुर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या अर्थसहाय्य योजनेकरीता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.**

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता महाज्योती, या संस्थेमार्फत भारतीय वन सेवा (UPSC) पुर्व परीक्षा- 2024 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेकरीता एक रकमी आर्थिक सहाय्य प्रदान करण्यासाठी इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांकडून दि.10/07/2024 ते दि.20/07/2024 रोजी पर्यंत महाज्योतीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते.

त्यानुसार या कार्यालयास प्राप्त झालेल्या ऑनलाईन अर्जांची तपासणी करुन पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेसाठी अर्थसहाय्य सुद्धा प्रदान करण्यात आलेले आहे. मात्र काही विद्यार्थी सदर योजनेसाठी अर्ज करण्याकरीता वंचित राहिले असुन सदर विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी या कार्यालयास केलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारी व मागणी विचारात घेता महाज्योती, या कार्यालयामार्फत मुख्य परीक्षेच्या तयारीकरीता एकरकमी अर्थसहाय्य योजनेचा लाभ देण्यासाठी विद्यार्थ्यांना दि.10/09/2024 रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.

(स्वा.)
(राजेश खवले)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर